# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष व शिफारशी


५.१ प्रस्तावना

५.२ अध्ययन विषयक निष्कर्ष व शिफारशी

५.३ अध्यापन विषयक निष्कर्ष व शिफारशी

५.४ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी

५.५ पुढील संशोधनासाठी कांही विषय

## प्रकरण पाचवे

## निष्कर्ष व शिफारशी

### ५.१ प्रस्तावना :

कोणताही विषय शिकताना किंवा शिकविताना आनंद वाटला पाहिजे हे रविंद्रनाथ टागोरांचे शिक्षण विषयक पहिले प्रधान सूत्र होते. प्रस्तुत शोधप्रबंधात "करवीर तालुक्यातील प्राथमिक शाळा-मधील मराठी विषयाच्या अध्यापनाच्या आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास ... ." या विषयाच्या संदर्भात अध्यापनाच्या बाबतीतील समस्यांचा उहापोह केलेला आहे. अध्यापनाच्या बाबतीतील समस्यांचा विद्यार्थ्यांच्यासाठी मुलाखतसूची व अध्यापकांच्यासाठी मुलाखतसूचीद्वारे प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण केले असून अन्वयार्थ लावला आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविण्यात आलेले आहेत.

### समस्येचे शब्दांकन :

"करवीर तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील मराठी विषयाच्या अध्यापनाच्या आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास ... ."

संशोधनाची उद्दिष्टे :

१) प्राथमिक स्तरावरील मातृभाषा मराठीच्या अध्यापनासंबंधीच्या अडचणींचा शोध घेणे.

२) प्राथमिक स्तरावरील अध्ययन-अध्यापनाच्या अडचणींचा शोध घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३) महाराष्ट्र राज्यात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्राथमिक स्तरावर काय काय करता येईल याचा शोध घेऊन शिफारशी करणे.

४) मराठी विषयाचे अध्यापन करतांना शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

५) मराठी विषयाचे अध्यापन करतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधन पध्दती :

सदरचे संशोधन वर्तमानकालीन समस्येच्या संदर्भात असल्याने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. कारण विशिष्ट बाबतीत असलेली सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी या पध्दतीचा वापर केला जातो.

संशोधन साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सामग्री गोळा करण्यासाठी साधने म्हणून विद्यार्थी मुलाखत सूची, अध्यापक मुलाखत सूची या

साधनांचा वापर केला.

जनसंख्या व नमुना निवड :

संपूर्ण जनसंख्येचे प्रतिनिधित्व करु शकणाऱ्या एका लहान गटाच्या अभ्यासावरुन संपूर्ण जनसंख्येच्या प्रवृत्ती बाबत पूर्वानुमान काढणे अधिक श्रेयस्कर असते.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात असलेली जनसंख्या म्हणजे करवीर तालुक्यातील प्राथमिक मराठी शाळा १७५ आहेत. त्यापैकी १० प्राथमिक शाळा निवडल्या आहेत. त्याचे शेकडा प्रमाण (५·७१ %) आहे.

या प्रमाणे विद्यार्थी व शिक्षकांची निवड केली. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या वर्गात प्रथम भाषा मराठी म्हणून मराठीचे अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी आहेत. शिक्षकांची निवड करताना निवड केलेल्या शाळेतील इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या वर्गांना अध्यापन करणारे सर्व अध्यापक आहेत. एकूण विद्यार्थी १५७ व एकूण अध्यापक १६ आहेत. विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण ७·८५ % व अध्यापकांचे शेकडा प्रमाण १६ % आहे.

संशोधनात विद्यार्थी मुलाखतसूची व अध्यापक मुलाखत सूची द्वारे प्राप्त झालेल्या प्रस्तुत संशोधनविषयक सामग्रीचे विश्लेषण वर्गीकरण करुन अन्वयार्थ लावला आहे. संशोधनातून आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

अध्यापन

## ५•२ अध्यापन विषयक निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत विभागात प्रकरण क्रमांक ४ - संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि कार्यपद्धती या मधील अध्यापनासंबंधीच्या समस्यांचा विचार केला असता विद्यार्थ्यांच्या मुलाखतसूचीद्वारे प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्याचे विवरण केलेले आहे व त्यावर आधारित पुढील परिच्छेदांतून शिफारशी केलेल्या आहेत.

### ५•२•१ गद्य पाठाचे आकलन :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•१ वरुन असे दिसून येते की एकूण १५७ विद्यार्थ्यांपैकी १४० विद्यार्थ्यांना (८९•१७ %) धडा समजतो. याचाच अर्थ असा की, वर्गात शिकविलेल्या धड्याचे बहुतांशी विद्यार्थ्यांना आकलन होते.

### ५•२•२ पद्य पाठाचे आकलन :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १५७ विद्यार्थ्यांपैकी १३० विद्यार्थ्यांना (८२•८ %) पद्याचे आकलन होते. याचाच अर्थ असा की, वर्गात शिकविल्या जाणाऱ्या पद्य पाठांचे आकलन फार मोठ्या गटाला होते.

### ५·२·३ बालभारती पाठयपुस्तकाची उपलब्धता :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४·३ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १५७ विद्यार्थ्यांपैकी १५७ विद्यार्थ्यांच्या (१०० %) जवळ बालभारतीचे पाठयपुस्तक असते. याचाच अर्थ असा की, हे पुस्तक सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे आणि सर्व विद्यार्थी पाठाच्या वेळी हे पाठयपुस्तक घेऊन येतात.

### ५·२·४ गद्य पाठांचे आकलन व वाचन :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४·४ वरुन असे स्पष्ट होते की, संशोधिकेने १४० विद्यार्थ्यांच्याकडून पाठयपुस्तकातील धडे वाचून घेतले. या बाबतीत संशोधिकेचे निरीक्षण असे आहे की, १४० विद्यार्थ्यांपैकी ९० विद्यार्थी योग्य गतीने आकलनपूर्वक सुस्पष्ट वाचन करतात. तसेच वाचन करताना हे विद्यार्थी पूर्णविराम, स्वल्पविराम व अवतरण चिन्हे यांचा अर्थ समजून वाचन करतात. या वरुन असा निष्कर्ष निघतो की (६४·४ %) विद्यार्थी आकलनपूर्वक वाचन करतात. एकूण १४० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी(२१·४२ %) सावकाश अडखळत धडा वाचतात व १४० विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी(१४·२८ %) अक्षरे, शब्द जोडून वाचतात. या २० मुलांच्या (१४·२८ %) वाचनात फारशी प्रगती झालेली नाही असे आढळून येते.

### ५·२·५ पद्य पाठामध्ये अभिरुची :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४·५ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १५७ विद्यार्थ्यांपैकी १५७ विद्यार्थ्यांना (१०० %)

कविता पाठ आहे. याचाच अर्थ असा की, वर्गात शिकविल्या जाणा-या पद्य पाठांचे पाठांतर वर्गातील विद्यार्थ्यांच्या संपूर्ण गटाला होते. शंभर टक्के विद्यार्थी पद्य पाठामध्ये अभिरुची घेतात.

५•२•६ लेखन कौशल्याविषयी :

संशोधिका एकूण विद्यार्थी १५७ पैकी १४० विद्यार्थ्यांच्या कडून "आई" या विषयावर छोटी छोटी ५ वाक्ये लिहून घेतात. त्यांना असे आढळून आले की, १४० विद्यार्थ्यांपैकी ९० विद्यार्थी - (६४•१ %) "आई" या विषयावर आकलनपूर्वक लेखन करतात. यावरुन असा निष्कर्ष काढता येईल की, ६४•१ % विद्यार्थी लेखन क्षमता प्राप्त केलेले आहेत. २१•४ % विद्यार्थी लेखनात थोडया फार प्रमाणात चुका करतात. १४•१ % विद्यार्थ्यांना "आई" या विषयावर छोटी छोटी वाक्य तयार करता येत नाही.

५•२•७ भाषा-संभाषण कौशल्य :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•७ या वरुन असे स्पष्ट होते की, एकूण विद्यार्थी १५७ पैकी १२० (७६•४ %) विद्यार्थी "माझी शाळा" या विषयावर छोटी छोटी वाक्ये बोलतात. एकूण विद्यार्थी १५७ पैकी २७ (१७•१ %) विद्यार्थी अडखळत बोलतात. एकूण विद्यार्थी १५७ पैकी १० विद्यार्थी (६•१ %) "माझी शाळा" या विषयावर कांहीच बोलत नाहीत.

## ५•३ अध्यापन विषयक निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत विभागात प्रकरण क्रमांक चार मधील - संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि कार्यपध्दती या मधील अध्यापकासंबंधीच्या समस्यांचा विचार केला असता अध्यापकांच्या मुलाखतसूचीद्वारे आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्यांचे विवरण केलेले आहे आणि त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -

### ५•३•१ श्रवण उद्दिष्टाविषयी - निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•१ वरुन असे स्पष्ट होते की एकूण ३६ अध्यापकांपैकी १० अध्यापकांचे (२७•७ %) मत असे आहे की, प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "श्रवण" हे उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते. "श्रवण" हे उद्दिष्ट मोठया प्रमाणात साध्य होते असे मत एकूण १५ अध्यापकांचे (४१•६ %) आहे. "श्रवण" हे उद्दिष्ट कमी प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी ११ अध्यापकांचे (३०•५ %) आहे. याचाच अर्थ असा की, प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "श्रवण" हे उद्दिष्ट फार मोठया विद्यार्थ्यांच्या गटाला साध्य होते.

### ५•३•२ "श्रवण" उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये येणाऱ्या अडचणींविषयी :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•२•२ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २० अध्यापक (५५•५ %) "श्रवण"

उद्दिष्ट साध्य करतांना अडचणी येतात असे मत व्यक्त करतात. फार कमी प्रमाणात अडचणी येतात असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (४४.४ %) आहेत.

याचाच अर्थ असा की, "श्रवण" उद्दिष्ट साध्य करतांना कमी प्रमाणात अडचणी येतात. फार मोठया विद्यार्थ्यांच्या गटाला "श्रवण" हे उद्दिष्ट साध्य होते.

५.३.३ अडचणींवर मात करणे विषयी

प्रकरण क्रमाक ४ मधील सारणी क्रमांक ४.२.३ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापक (१०० %) प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "श्रवण" उद्दिष्ट साध्य करीत असतांना येणाऱ्या अडचणींवर मात करु शकतात.

५.३.४ ऐकलेल्या मजकूराच्या आकलनाविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४.२.४ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापकांचे (७२.२ %) विद्यार्थी ऐकलेल्या मजकूराचा अर्थ समजतात. याचाच अर्थ असा की, ऐकलेल्या मजकूराचे आकलन पुष्कळ विद्यार्थ्यांना होते.

५.३.५ गाणी, कविता, कथा या विषयी अभिरुची असणे विषयी :

प्रकरण क्रमाक चार मधील सारणी क्रमाक ४.२.५ या वरुन

स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१००%) विद्यार्थी गाणी, कविता, गोष्टी आवडीने ऐकतो असे आहे. याचाच अर्थ असा की, १०० % विद्यार्थी या विषयामध्ये रस घेतात.

५.१.६ संभाषण कलेविषयी :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४.१.६ वरून असे स्पष्ट होते की, संभाषण हे उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते असे मत एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१०० %) आहे.

५.१.७ "संभाषण" उद्दिष्ट सुलभ होणेविषयी :

निष्कर्ष

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्र. ४.१.७ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१०० %) मत असे आहे की, "संभाषण" उद्दिष्ट सुलभ होते. याचाच अर्थ असा की, वर्गामध्ये फार मोठया प्रमाणात विद्यार्थी "संभाषण" विषयामध्ये सहभागी होतात व स्वतःचे विचार प्रकट करतात.

५.१.८ "संभाषण" उद्दिष्ट अवगत होणे विषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्र. ४.१.८ यावरून स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (१०० %) अडचणींवर मात करतात. याचाच अर्थ असा की, संभाषणामध्ये पुष्कळ विद्यार्थी सहभागी होतात.

५•३•९ शब्दांचे उच्चार योग्य होणेविषयी - निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्र. ४•२•९ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २४ अध्यापकांचे (६६•६ %) मत असे आहे की, विद्यार्थी शब्दांचे उच्चार, योग्य करतात. याचाच अर्थ असा की बहुतांशी विद्यार्थी शब्दांचा उच्चार योग्य प्रकारे करतात.

५•३•१० योग्य उत्तरे देण्याविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्र. ४•२•१० वरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २८ अध्यापक (७७•७ %) विद्यार्थी प्रश्नांची योग्य उत्तरे देतात असे मत व्यक्त करतात. याचाच अर्थ असा की, वर्गात विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे फार मोठया प्रमाणात विद्यार्थी देतात.

५•३•११ संभाषण कौशल्यविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•११ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २८ अध्यापक (७७•७ %) असे म्हणतात की, विद्यार्थी सहजपणे "संभाषणात" भाग घेतो.

५•३•१२ गोष्ट अभिनययुक्त सांगणे विषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•१२ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २२ अध्यापक (६१•१ %) असे

स्पष्ट करतात की, विद्यार्थी अभिनययुक्त गोष्ट स्पष्ट करतात.

५.१.१३ नाट्यीकरणात भाग घेणे विषयी - निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४.२.१३ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण अध्यापक ३६ पैकी २२ अध्यापकांचे (६१.२%) मत आहे की, विद्यार्थी नाट्यीकरणात भाग घेतात. याचाच अर्थ असा की, वर्गातील बहुतांशी विद्यार्थी नाट्यीकरणात भाग घेतात.

५.१.१४ "वाचन" उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते याविषयी निष्कर्ष :

प्रकरण चार मधील सारणी क्रमांक ४.२.१४ या वरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी १८ अध्यापकांचे (५० %) मत आहे. "वाचन" हे उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते. एकूण ३६ अध्यापकांपैकी १० (२७.७ %) अध्यापक "वाचन" हे उद्दिष्ट मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करतात. एकूण ३६ अध्यापकांपैकी ८ अध्यापकांचे (२२.२ %) मत असे आहे की, "वाचन" हे उद्दिष्ट कमी प्रमाणात साध्य होते. याचाच अर्थ असा की, ७७.७७ टक्के शिक्षकांच्या मते "वाचन" हे उद्दिष्ट फार मोठया विद्यार्थ्यांच्या गटाला साध्य होते.

५.१.१५ "वाचन" क्षमतेविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४.२.१५ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापकांचे (७२.२ %) मत असे आहे की "वाचन" उद्दिष्ट साध्य करतांना अडचणी येतात.

५•३•१६ <u>"वाचन" क्षमतेविषयी निष्कर्ष</u> :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्र. ४•२•१६ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २८ अध्यापक (७७•७ %) "वाचन" या समस्येवर मात करतात. याचाच अर्थ असा की, बहुतांशी शिक्षक वाचन क्षमतेच्या विकासात येणाऱ्या अडचणींवर मात करतात.

५•३•१७ <u>गद्य पाठ सलग वाचणेविषयी निष्कर्ष</u> :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•१७ या वरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी धडा सलगपणे वाचू शकतो. याचाच अर्थ असा आहे की, बहुतांशी विद्यार्थी धड्याचे वाचन सलगपणे करतात.

५•३•१८ <u>धड्याच्या किंवा गद्यपाठाच्या आकलनाविषयी निष्कर्ष</u> :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•१८ या वरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थ्यांना धड्याचे आकलन होते.

५•३•१९ <u>फळ्यावरील वाक्ये वाचण्याविषयी निष्कर्ष</u> :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•१९ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण अध्यापकांपैकी २७ अध्यापक (७५ %) असे

सुचवितात की, विद्यार्थी फळ्यावरील वाक्ये वाचतात. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थ्यांकडे वाचनक्षमता आहे.

५•१•२० कथा, कविता, संवाद यांच्या आकलना विषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•२•२० यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापकांचे (७२•२ %) मत असे आहे की, विद्यार्थी पाठयपुस्तकातील कथा, कविता, संवाद आकलनपूर्वक वाचन करतो.

५•१•२१ बालगीतांच्या अभिरुची विषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२१ या वरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ (१०० %) अध्यापकांचे मत असे आहे की, विद्यार्थी बडबडगीते व बालगीते आवडीने म्हणातो.

५•१•२२ लेखन कौशल्याबाबत

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•२•२२ यावरुन असे स्पष्ट होते की, ५० % लेखन कौशल्ये फार मोठया प्रमाणात साध्य होते. २५% लेखन कौशल्य मोठया प्रमाणात साध्य होते. २५ % लेखन कौशल्य कमी प्रमाणात साध्य होते. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थ्यांना लेखन कौशल्य प्राप्त होतात.

५•१•२३ लेखनातील अडचणींविषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२३ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण अध्यापक ३६ पैकी ३६ अध्यापकांचे (१०० %) असे मत आहे की, "लेखन" हे उद्दिष्ट साध्य करतांना अडचणी येतात.

५•१•२४ "लेखन" उद्दिष्ट सफल होणेविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२४ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापकांचे (१०० %) मत असे आहे की, "लेखन" कौशल्य प्राप्त करीत असतांना येणाऱ्या समस्यांवर मात करता येते.

५•१•२५ छोटी छोटी वाक्ये लिहिण्याविषयी :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•२•२५ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी छोटी छोटी वाक्ये योग्य गतीने लिहितात.

५•१•२६ परिसर व अनुभवावर आधारित वाक्ये तयार करणे विषयी : निष्कर्ष

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२६ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी परिचित विषयावर व अनुभवावर वाक्यरचना

करु शकतो. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थी परिचित विषयावर व अनुभवावर स्वत: वाक्यरचना तयार करुन लिहितात.

५•१•२७ वळणदार हस्ताक्षराविषयी :

प्रकरण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२७ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी वळणदार हस्ताक्षर काढू शकतात. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थी वळणदार हस्ताक्षर काढतात.

५•१•२८ वाचलेल्या गोष्टींचे आकलनाविषयी निष्कर्ष :

प्र करण क्रमांक चार मधील सारणी क्रमांक ४•२•२८ या वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी वाचलेल्या गोष्टींचे सारांश लिहू शकतो. याचाच अर्थ असा की, बहुतांशी विद्यार्थ्यांना वाचलेल्या गोष्टींचे आकलन झालेले असते.

५•१•२९ शुध्द लेखनाविषयी निष्कर्ष :.

प्रकरण चार मधील सारणी क्रमांक ४•२•२९ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) मत असे आहे की, विद्यार्थी लेखनात विरामचिन्हांचा योग्य वापर करतो. याचाच अर्थ असा आहे की बहुतांशी विद्यार्थी लेखनात विरामचिन्हांचा योग्य वापर करुन लेखन शुध्द लिहितात.

५•१•१० वाक्प्रचार व म्हणी विषयी ज्ञान असणे विषयी निष्कर्ष :

प्रकरण चार मधील सारणी क्रमांक ४•२•१० या वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी २२ अध्यापकांचे (६१•१ %) मत असे आहे की, विद्यार्थी लेखनात वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग करतात. १८•८ % अध्यापकांचे मत असे आहे की, विद्यार्थी लेखनात वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग करत नाहीत.

५•१•११ मराठी अध्यापनातील रुची विषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४•२•११ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१00 %) मत असे आहे की, विद्यार्थी मराठी अध्यापनात मोठया प्रमाणात रुची दाखवितात.

५•१•१२ मराठी विषयात रुची नसणे विषयी :

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४•२•१२ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१00 %) मत असे आहे की, विद्यार्थ्यांना मराठी विषय आवडतो. 0 % विद्यार्थी मराठी विषयात रुची घेत नाहीत.

५•१•१३ मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी होणे विषयी निष्कर्ष :

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४•२•१३ यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१00 %) मत असे

आहे की, विविध शैक्षणिक उपक्रमांचे उपयोग झाल्यास मराठी अध्यापन प्रभावी होउ शकते.

५.१.१४ मुलांचे शुध्द लेखनाविषयी :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४.२.१४ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (१०० %) विद्यार्थ्यांचे शुध्द लेखन सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतात.

५.१.१५ शुध्द लेखनाविषयी निष्कर्ष :

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४.२.१५ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (१०० %) शुध्द लेखनाविषयी जाणीवपूर्वक प्रयत्न करतात.

५.१.१६ हस्ताक्षर सुधारण्याविषयी निष्कर्ष :

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४.२.१६ यावरून असे स्पष्ट होते की एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (१०० %) विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी प्रयत्न करतात.

५.१.१७ मराठीचे अध्यापन सुलभपणे होणेविषयी विष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४.२.१७ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१०० %) मत असे

आहे की, सर्व विद्यार्थ्यांच्याजवळ मराठीचे पाठ्यपुस्तक असते. याचाच अर्थ असा की, विद्यार्थी मराठीच्या अध्यापनाच्या वेळी मराठीचे पाठ्य-पुस्तक जवळ घेऊन बसतात. एकंदरीत मराठीचे अध्यापन प्रभावी होते.

५·१·१८ मराठीच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग याविषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४·१·१८ या वरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापक (१०० %) मराठी विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग करतात.

५·२·१९ शैक्षणिक साधनांचा अध्यापनात उपयोग करणे विषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४·२·१९ यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापक (१०० %) मराठीच्या अध्यापनात विविध शैक्षणिक साधनांचा उपयोग करून अध्यापन परिणामकारक करतात.

५·१·४० संशोधन विषयी अधिक माहिती विषयी निष्कर्ष :

प्रकरण क्रमांक ४ मधील सारणी क्रमांक ४·२·४० यावरून असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी केवळ ४ अध्यापकांनी (११·१ %) संशोधन विषयी अधिक माहिती दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे -

५.४ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :

१) स्पर्धात्मक परीक्षामध्ये मराठी भाषेला योग्य स्थान दिले पाहिजे.

२) मातृभाषा मराठीचा अभ्यास अधिक ठोकस, सकस व सुदृढ व्हावयाचा असेल तर तज्ज्ञ शिक्षक, सकस अभ्यासक्रम, भरपूर वेळ, विविध साधने या गोष्टींकडे लक्ष पुरविले पाहिजे.

३) मराठी माणसास मराठीतून शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य द्यावे. प्रादेशिक भाषा न जाणणाऱ्यांना इतर वैकल्पिक माध्यमाची सोय करावी.

४) प्रशिक्षित अध्यापकांकडेच "मराठी" या विषयाचे अध्यापन असावे. विद्यार्थ्यांच्या संवेदना व भावना यांना आवाहन करणारा आशय व अध्ययनपध्दती मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेत वापर होणे आवश्यक आहे.

५) मराठी भाषा विषयक वातावरण निर्माण करणे.

६) शिक्षण संस्थेकडून मराठीचे महत्व प्रस्थापित होईल असे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे.

७) सांस्कृतिक परंपरेची जोपासना व संवर्धन करण्यास मराठीला अग्रक्रम देणे क्रमप्राप्त ठरते.

८) "मराठी हा विषय फार सोपा" असा गैरसमज करुन घेतला आहे तो दूर केला पाहिजे.

९) मराठीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यास, कोणत्या गरजा आहेत त्या जाणून घेण्यास परिसंवाद, चर्चासत्रे यांचे वेळोवेळी आयोजन करणे इष्ट आहे.

१०) अभ्यासक्रमात उदार ( Liberal ), विकासात्मक ( Development ) आणि व्यवसायात्मक ( Vocational ) शिक्षण यांचीही गरजेनुसार तरतूद असावी.

५•५ पुढील संशोधनासाठी कांही विषय :

१) प्रकरण चार "करवीर तालुक्यातील प्राथमिक शाळामधील मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापनाच्या आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास" मध्ये मराठी विषयाचे मूल्यमापन अधिक यथार्थ, विश्वसनीय आणि उद्दिष्टानुसार होणे आवश्यक आहे. त्यासाठी मूल्यमापनाची विविध साधने वापरणे अनिवार्य आहे. अशा त-हेची साधने कोणती ? त्याचे स्वरुप काय ? ती कशी तयार करावयाची या संबंधी संशोधन होणे आत्याचे आहे.

२) त्याच बरोबर अध्यापकांना प्रशिक्षण देणे जरुरीचे आहे. तरी ते कसे द्यावयाचे या संबंधी देखील संशोधन होणे आवश्यक आहे.

३) मराठीच्या अध्ययन-अध्यापनाला उपयुक्त असे कांही पूरक साहित्य तयार करता येईल काय ? ते कितपत परिणामकारक आहे, हे तपासून पाहता येईल काय ? या विषयी एक शोधप्रकल्प हाती घेण्यासारखा आहे.

....